(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात**

**नागपूर खंडपीठ : नागपूर**

**रिट याचिका (रि.या.) क्र. ४८३५/२०२१**

श्रीमती सुधा, भागीरथ मेश्राम यांची विधवा
वय अंदाजे ५२ वर्ष, धंदा गृहिणी,
रा.बडेगाव, तहसील कोरची,
जिल्हा गडचिरोली. ...... याचिकाकर्ती

// विरुद्ध //

१) जिल्हा परिषद, तिच्या
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा गडचिरोली मार्फत

२) जिल्हा परिषद, तिच्या
लेखा अधिकारी, वित्त विभाग,
जिल्हा गडचिरोली मार्फत

३) जिल्हा परिषद हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज,
तिच्या प्राचार्य, बडेगाव, तालुका कोरची,
जिल्हा गडचिरोली मार्फत ........ उत्तरवादी

---

कु. राशी ए. देशपांडे, याचिकाकर्तीचे वकील
श्री एस.डी. झोटिंग, उत्तरवादींचे वकील

---

**न्यायमंच : न्यायमूर्ती ए. एस. चांदुरकर आणि**
**एम. डब्ल्यू. चांदवानी,**
**दिनांक : २७/०३/२०२३**

**<u>न्यायनिर्णय</u> :** (न्यायमूर्ती एम. डब्ल्यू. चांदवानी द्वारे)

विधीनिर्णय. त्वरित सुनावणीसाठी विधीनिर्णय. पक्षकारांच्या वकिलांचे म्हणणे ऐकले.

२. मृत कर्मचाऱ्याने दिलेल्या हमीपत्राच्या आधारे, नियोक्ता मृत कर्मचाऱ्याला अतिरिक्त प्रदान करण्यात आलेली रक्कम मृत कर्मचाऱ्याच्या कायदेशीर वारसांकडून वसूल करू शकतो का? असा प्रश्न या याचिकेत उपस्थित करण्यात आला आहे.

३. याचिकाकर्ती ही मृत भागीरथ मेश्राम (यापुढे 'मृत कर्मचारी' असे संदर्भित), जे जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये कनिष्ठ अधिव्याख्याता म्हणून कार्यरत होते, यांची पत्नी आहे. ते सेवेत असताना त्यांचे ०६.१२.२०१६ रोजी निधन झाले. याचिकाकर्तीला दरमहा रुपये १४,२५०/ - कुटुंब निवृत्तीवेतन मिळू लागले. उतरवादींकडून ग्रेड वेतन निश्चित केले जात असताना, मृत व्यक्तीने त्याला प्रदान करण्यात आलेली अतिरिक्त रक्कम जर असेल तर ती परत करण्याचे हमीपत्र दिले होते. मृत कर्मचाऱ्याने दिलेल्या सदर हमीपत्रानुसार उत्तरवादी क्र. २ यांनी दिनांक १८.१.२०२१ आणि २२.४.२०२१ या दोन पत्रव्यवहारांद्वारे याचिकाकर्तीला ग्रेड वेतनाच्या चुकीच्या निश्चितीमुळे मृत कर्मचाऱ्याला प्रदान करण्यात आलेली अतिरिक्त रक्कम रु.२,६२,८४१/- निवृत्तीवेतनातून वसूल करण्यासाठी संमतीपत्र करून देण्यास सांगितले, ज्याला या रिट याचिकेत आव्हान देण्यात आले आहे.

४. याचिकाकर्तीचे विद्वान वकील तसेच उत्तरवादिंचे विद्वान वकील यांचे म्हणणे

ऐकून घेतल्यानंतर एखाद्या कर्मचाऱ्याला केलेल्या ज्यादा रकमेच्या प्रदानाच्या वसुली संदर्भात कायद्याची थोडक्यात नोंद घेऊ या.

५. साहिब राम विरुद्ध हरियाणा राज्य आणि इतर १९९९ पुरवणी (१) एसएससी १८ मध्ये प्रसिद्ध, सर्वोच्च न्यायालयाने संबंधित कर्मचाऱ्याकडून कोणत्याही प्रकारचे अपवेदन केले गेले नसताना देखील संबंधित प्राधिकरणाने संबंधित आदेश चुकीचा तयार केल्यामुळे वाढलेल्या वेतनश्रेणी अंतर्गत जे वेतन प्रदान केले गेले होते त्याच्या वसुली करण्यासाठी प्रतिबंध केला, असा निर्णय देण्यात आला की :

> "५. हे मान्य आहे की, अपीलकर्त्याकडे आवश्यक शैक्षणिक पात्रता नाही. अशा परिस्थितीत अपीलकर्त्याला शिथिलतेचा हक्क नसेल. प्राचार्यनी त्याला शिथिलता देण्यात चूक केली आहे. शिथिलता मिळाल्याच्या दिनांकापासून अपीलकर्त्याला सुधारित श्रेणीवर वेतन देण्यात आले होते. तथापि अपीलकर्त्याने केलेल्या कोणत्याही चुकीच्या अपवेदनामुळे त्याला उच्च वेतनश्रेणीचा लाभ देण्यात आला नाही, तर प्राचार्यांनी चुकीचा अन्वयार्थ लावल्याने त्याकरिता अपीलकर्त्यास दोषी धरता येणार नाही. अशा परिस्थितीत आजपर्यंत देण्यात आलेली रक्कम अपीलकर्त्याकडून वसूल करता येणार नाही.समान कामासाठी समान वेतन हे तत्व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या श्रेण्यांना लागू होणार नाही. खर्चाबाबत कोणताही आदेश न देता अपील अंशतः

मंजूर करण्यात येत आहे."

६. कर्नल बी जे अक्कारा (निवृत्त) वि. भारत सरकार आणि इतर (२००६)११ एससीसी ७०९ मध्ये प्रसिद्ध सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्णय दिला :

"२७. विचारात घेण्यासारखा शेवटचा प्रश्न हा आहे की, ७.६.१९९९ च्या परिपत्रकाचा चुकीचा अर्थ लावल्यामुळे/समजून घेतल्यामुळे ज्यादा दिलेल्या रकमेच्या वसुलीवर दिलासा द्यावा का? खालील अटींची पूर्तता केल्यास या न्यायालयाने अतिरिक्त चुकीच्या दिलेल्या वित्तलब्धि / भत्ते यांच्या कर्मचाऱ्याकडून वसुली विरुद्ध सातत्याने दिलासा दिला आहे. [पहा साहिबराम वि. हरियाणा राज्य [१९९५ पुरवणी (१) एससीसी १८ :१९९५ एससीसी (एल आणि एस) २४८], श्याम बाबू वर्मा वि.भारतीय संघ [(१९९४)२ एससीसी ५२१ : १९९४ एससीसी (एल आणि एस) ६८३ : (१९९४) २७ एटीसी १२१], भारतीय संघ वि. एम.भास्कर [(१९९६) ४ एससीसी ४१६ : १९९६ एससीसी (एल आणि एस)९६७] आणि व्ही गंगाराम वि. प्रादेशिक सहसंचालक [(१९९७) ६ एससीसी १३९ : १९९७ एससीसी (एल आणि एस) १६५२])

(अ) कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही अपवेदनामुळे किंवा फसवणुकीमुळे अतिरिक्त प्रदान केले गेले नाही.

(ब) असे अतिरिक्त प्रदान नियोकत्याने वेतन /भत्त्याची गणना करण्यासाठी चुकीचे तत्व वापरून किंवा नियम/आदेशाच्या विशिष्ट अर्थउकलाच्या आधारावर केले होते, जे नंतर चुकीचे असल्याचे आढळले.

२८. अतिरिक्त प्रदान केलेल्या रकमेच्या वसुलीवर प्रतिबंधाचा हा दिलासा न्यायालयाकडून कर्मचाऱ्यांना त्यांचे अधिकार म्हणून नव्हे तर समन्यायी दृष्टीने, न्यायिक विवेकबुद्धीचा वापर करून, वसुली अमलात आणल्यास, त्यातून होणाऱ्या त्रासातून

कर्मचाऱ्यांना मुक्तता मिळावी या दृष्टीने दिला जातो. सरकारी नोकरास, विशेषतः जो निम्नस्तरावरील सेवेत आहे,जी काही वितलब्धी मिळेल ते त्याच्या कुटुंबाच्या पालनपोषणासाठी खर्च करेल. जर त्यास दीर्घ कालावधीसाठी अतिरिक्त रक्कम मिळाल्यास, तर तो त्याचा हक्कदार आहे असा समज करून तो ती रक्कम खर्च करेल. अतिरिक्त रकमेच्या वसुलीची कार्यवाही नंतर केल्यास, त्याचा त्याला नाहक त्रास होईल, अशा दृष्टीने दिलासा दिला जातो. परंतु जिथे कर्मचाऱ्याला माहीत असेल की, प्राप्त झालेले रक्कम देय रकमेपेक्षा अतिरिक्त किंवा चुकून प्रदान केलेली आहे किंवा जेथे चूक लक्षात आली आहे किंवा चूक दुरुस्ती, चुकून प्रदान केल्यानंतर थोड्याच कालावधीत

आढळली आहे, अशा प्रसंगी न्यायालय वसुली विरुद्ध दिलासा देणार नाही.असे प्रकरण न्यायिक तारतम्यतेच्या कक्षेत येत असल्याने, न्यायालय एखाद्या विशिष्ट प्रकरणातील तथ्ये व परिस्थितीनुसार वसुली विरुद्ध दिलासा देण्यास नकार देऊ शकेल.

२९. याच तत्वावर निवृत्तीवेतनधारक चुकून केलेली प्रदाने वसूल करण्यात येऊ नये यासाठी निर्देश मागू शकतात, कारण कार्यरत कर्मचाऱ्यांच्या तुलनेत निवृत्तीवेतन धारकांची परिस्थिती अधिक गैरसोयीची असते. चुकून अतिरिक्त प्रदान केलेल्या रकमेच्या वसुलीच्या प्रयत्नांमुळे त्यांना नाहक त्रास होऊ शकेल. याचिकाकर्ते हे अतिरिक्त प्रदानाच्या संदर्भात चुकीची माहिती देण्यासंदर्भात किंवा

फसवणूकीसाठी दोषी नाहीत. अंमलबजावणी करणाऱ्या विभागाच्या चुकीच्या समजुतीमळे किमान वेतनात एनपीए ची भर वरच्या टप्प्याच्या उद्देशाकरिता घालण्यात आली होती. त्यामुळे आमच्या मते दिनांक ७.६.१९९९ च्या परिपत्रकाच्या अनुषंगाने, दिनांक ११.९.२००१ चे स्पष्टीकरणात्मक परिपत्रक निर्गमित होईपर्यंत निवृत्तीवेतनाकरिता प्रदान केलेली कोणतीही अतिरिक्त रक्कम उत्तरवादीं वसूल करणार नाहीत. जोपर्यंत दिनांक ११.९.२००१ च्या परिपत्रकानंतर प्रदान केलेली जादा रक्कम आहे त्यासंबंधी नक्कीच भारत सरकार वसुली करण्यास पात्र आहे, कारण की सदर परीपत्रकाची वैधता मान्य करण्यात आलेली आहे आणि पूर्वी केलेल्या चुकीच्या गणणेसंबंधी

निवृत्तीवेतन धारकांना सूचना (नोटीस) देण्यात आलेली आहे."

७. सय्यद अब्दुल कादिर आणि इतर विरुद्ध बिहार राज्य आणि इतर (२००९) ३ एससीसी ४७५ मध्ये प्रसिद्ध प्रचलित बिहार राष्ट्रीयकृत माध्यमिक शाळा (सेवाशर्ती) नियमावली १९८३ च्या चुकीच्या अन्वयार्थामुळे आणि चुकीमुळे अपीलकर्ते - शिक्षकांना प्रदान केलेली अतिरिक्त रक्कम वसुली करण्याची मागणी करण्यात आली होती .त्यात अपीलकर्त्याने असा युक्तिवाद केला की, जरी असे मान्य करण्यात येत असेल की अपीलकर्ते पदोन्नतीवरील अतिरिक्त वेतनवाढीचा लाभ मिळण्यास पात्र नाही, तरीसुद्धा अतिरिक्त प्रदान केलेली रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात येऊ नये कारण ती रक्कम त्यांच्या कोणत्याही अपवेदनामुळे किंवा फसवणूक न करता, अतिरिक्त रक्कम प्रदान करण्यात आली.सर्वोच्च न्यायालयाने असे मान्य केले की, अशा परिस्थितीत अपीलकर्त्यांना जबाबदार धरता येणार नाही आणि ज्यादा प्रदान केलेल्या रकमेच्या वसुली करता आदेश देण्यात येऊ नये, विशेषतः जेव्हा कर्मचारी नंतर निवृत्त झाला असेल.माननीय न्यायालयाने त्यांच्या निरीक्षणात असे म्हटले आहे की, सामान्य भाषेत जिथे कर्मचाऱ्याकडून कोणतेही अपवेदन दिले गेले नसल्यास किंवा फसवणूक केली गेली नसल्यास आणि जेव्हा एखाद्या नियमाचा किंवा आदेशाचा चुकीचा अर्थ लावून /समजुतीने

ज्यादा रक्कम प्रदान केली गेली असल्यास न्यायालयाकडून अशी वसुली प्रतिषिद्ध आहे. असा निर्णय देण्यात आला की :

"५९. नि:संशयपणे, अपीलकर्त्या शिक्षकांना जी अतिरिक्त रक्कम प्रदान करण्यात आली आहे ती त्यांच्याकडून कोणतेही चुकीचे अपवेदन दिले गेले नसताना किंवा फसवणूक केली गेली नसताना आणि अपीलकर्त्यांना सुद्धा या गोष्टीची माहिति नव्हती की, त्यांना जी रक्क्म प्रदान करण्यात येत आहे, ती त्यांच्या हक्कांपेक्षां जास्त आहे. येथे असे नमूद करणे वावगे ठरणार नाही की, वित्त विभागाने त्यांच्या प्रति - प्रतिज्ञापत्रात मान्य केले आहे की, त्त्यांच्याकडून सद्भभावमूलक चूक झाली होती. जादा प्रदान केलेली रक्कम त्यांना लागू असलेल्या नियमाच्या चुकीच्या अन्वयार्थाचा परिणाम आहे, ज्याकरिता अपीलकर्त्याना जबाबदार ठरविता येऊ शकत नाही. किंबहुना हा संपूर्ण गोंधळ बिहार राज्य सरकारच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्क्रियता, हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा मुळे निर्माण झाला आहे. अपीलकर्ता शिक्षकांच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी असे निवेदन .केले आहे की, “लाभार्थींपैकी अधिकतम निवृत्त झाले आहेत किंवा ते निवृत्तीच्या मार्गावर आहे.समोर असलेल्या प्रकरणातील विशिष्ट वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेता आणि अपीलकर्त्या शिक्षकांना

त्रास सहन करावा लागू नये म्हणून आमचे असे मत आहे की, अपीलकर्त्या शिक्षकांना जादा प्रदान करण्यात आलेली रक्कम वसूल करण्यात येऊ नये.”

८. पंजाब राज्य व इतर वि. रफिक मसीह (व्हाईट वॉशर) आणि इतर (२०१५) ४ एससीसी ३३४) मध्ये प्रसिद्ध कर्मचाऱ्याच्या कोणत्याही चुकीविना त्याला प्रदान केलेल्या अतिरिक्त रकमेच्या वसुलीकरिता नियोक्ता अधिकार हा मुद्दा माननीय सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयात हाताळला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या न्यायनिर्णयच्या परिच्छेद क्रमांक १८ मध्ये खालीलप्रमाणे म्हटले आहे.--

"१८. जेथे नियोक्त्याकडून कर्मचाऱ्याला त्याच्या हक्कादारीपेक्षा अतिरिक्त रक्कम चुकून प्रदान केली गेली आहे, अशा बाबतीत वसुलीच्या मुद्द्यांवर कर्मचाऱ्यांना नियंत्रित करणाऱ्या अडचणींच्या सर्व प्रसंगांना आधारतत्व म्हणून मांडणे शक्य नाही, मग ती उपरोक्त संदर्भित निर्णयाच्या आधारावर असेल त्याप्रमाणे, आम्ही सुलभ संदर्भ म्हणून खालील प्रमाणे काही परिस्थिती सारांश स्वरूपात देत आहोत, ज्यात कायद्यानुसार नियुक्तीला वसुली अनुज्ञेय नसेल.

(१) सेवेतील वर्ग ३ वर्ग ४ (किंवा सेवेतील गट 'क' व गट `ड' मधील) कर्मचाऱ्यांकडून वसुली.

(२) निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांकडून वसूली किंवा वसुली आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून.

(३) वसुली आदेश निर्गमित करण्याच्या आधी पाच वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता जादा रक्कम प्रदान केलेल्या कर्मचाऱ्यांकडून वसुली.

(४) एखाद्या कर्मचाऱ्याकडून त्याच्या पदापेक्षा उच्चपदावरील कर्तव्ये दोषपूर्ण रीतीने पार पाडावी लागले आणि ज्यास त्यानुसार रक्कम प्रदान केली गेली असल्यास आणि जरी त्यास योग्यरीतीने कनिष्ठ पदावर काम करणे आवश्यक होते, अशा प्रकारणांतील वसुली.

(५) अशा इतर कोणत्याही प्रकरणात, जेथे न्यायालय अशा निष्कर्षापर्यंत पोहोचले की, जर कर्मचाऱ्याकडून वसुली केली तर ती इतकी अन्यायकारक किंवा कठोर किंवा मनमानी असेल की, जी नियोक्त्याच्या वसुलीच्या अधिकाराच्या समान संतुलनापेक्षा कितीतरी जास्त असेल."

अशाप्रकारे सर्वोच्च न्यायालयाने अनेक निर्णयांमध्ये, विशेषतः रफिक मसीह (उपरोल्लेखित) यांच्या निर्णयात सातत्याने असे मत मांडले की, कर्मचाऱ्याच्या कोणत्याही अपवेदनामुळे किंवा फसवणुकीच्या कारणाकरिता अदा न केलेली जास्तीची रक्कम नंतर वसूल करता येणार नाही.

९. उत्तरवादिंकरिता उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी आमचे लक्ष पंजाब

आणि हरियाणा उच्च न्यायालय व इतर विरुद्ध जगदेव सिंग (२०१६) १४ एससीसी २६७ मध्ये प्रसिद्ध निर्णयाकडे वेधले आहे, ज्यामध्ये रफिक मसीह (उपरोल्लेखित) प्रकरणातील निर्णयांमध्ये नमूद केलेल्या परिस्थितीपैकी, एकाचा विचार केल्यावर सर्वोच्च न्यायालयाने परिच्छेद क्र. ११ मध्ये खालील प्रमाणे म्हटले आहे.

> ११. उपरोक्त प्रस्ताव (२) मध्ये नमूद केलेले तत्व, प्रस्तुत प्रकरणातील परिस्थितीला लागू होऊ शकत नाही.प्रस्तुत प्रकरणात,ज्या अधिकाऱ्याला पहिल्यांदा प्रदान करण्यात आले होते, त्या अधिकाऱ्याला स्पष्टपणे नोटीस देण्यात आली होती की, ज्यादा प्रदान केलेली रक्कम आढळल्यास, ती रक्कम त्यास परत करावी लागेल. ज्या अधिकाऱ्याने सुधारित वेतनश्रेणीचा विकल्प निवडताना हमीपत्र दिले आहे तो त्या हमीपत्राद्वारा बांधील आहे."

१०. सदर निर्णयाची मदत घेऊन उत्तरवादी यांच्यातर्फे उपस्थित विद्वान वकील असे जोरदारपणे नमूद करतात की, जगदेव सिंग (उपरोल्लेखित) प्रकरणातील निर्णयाचे प्रमाण प्रस्तुत प्रकरणात लागू राहील. कारण प्रस्तुत प्रकरणात सुद्धा मयत कर्मचाऱ्याने हमीपत्र दिले होते की, नियोक्त्याकडून कडून अतिरिक्त रक्कम प्रदान केली गेली तर ती त्यास त्याच्याकडून वसूल करता येइल.

११. सर्वोच्च न्यायालयाने रफिक मसीह (उपरोल्लेखित) प्रकरणात काही प्रसंगांचा

सारांश दिला आहे. ज्यामध्ये नियोक्त्याकडून वसुली करणे कायद्याने अनुज्ञेय नसेल. प्रसंगाचा विचार करताना सर्वोच्च न्यायालयाने असेही नमूद केले आहे की, जेथे नियोक्त्याकडून, कर्मचारी ज्या रकमेस हक्कदार आहे त्या रकमेपेक्षा जास्त रक्कम चुकून प्रदान करण्यात आली आहे याबाबतीत वसुलीच्या मुद्द्यावर कर्मचाऱ्यांना नियंत्रित करणाऱ्या सर्व प्रसंगांना आधारतत्व म्हणून मांडणे शक्य नाही. अशाप्रकारे रफिक मसीह (उपरोल्लेखित) च्या निर्णयात परिच्छेद १८ मध्ये जे प्रसंग नमूद केले आहेत ते परिपूर्ण नाहीत. असे इतर अनेक प्रसंग असू शकतील की ज्यामुळे वसुलीच्या मुद्द्यावरून कर्मचाऱ्यास त्रास निर्माण होईल, किंबहुना प्रसंग (५) मध्ये सर्वोच्च न्यायालयाने रफिक मसीहच्या प्रकरणात असे नमूद केले आहे की, जर मागणी केलेली वसुली इतकी अन्यायकारक, किंवा कठोर असल्यास जी नियोक्त्याच्या  वसुलीच्या अधिकाराच्या समान संतुलनापेक्षा जास्त असेल, अशी वसुली अनुज्ञेय असू नये. याचे कारण रफिक मसीहच्या प्रकरणात दिलेल्या निर्णयातील परिच्छेद क्र. ८ मध्ये आढळेल, जे येथे खालीलप्रमाणे उधृत् करण्यात आले आहे.- -

> ८. दोन पक्षकारांमध्ये जर दुसऱ्या पक्षकारास कोणतेही गंभीर नुकसान न करता, दोघांपैकी कमकुवत पक्षकाराच्या बाजूने निर्णय दिला गेला असल्यास (जे खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्य आहे), तर सोडविला जाणार प्रश्न, न्यायकल्पनेच्या सुसंगत असेल, ज्याची हमी भारतीय नागरिकांना, भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेतही दिलेली आहे. नियोक्त्याने पाठपुरावा केलेल्या वसुलीच्या अधिकाराची तुलना संबंधित

कर्मचाऱ्यावर वसुलीच्या परिणामांशी करावी लागेल. संबंधित कर्मचाऱ्याकडून वसुलीचा परिणाम नियोक्त्याच्या रक्कम वसूल करण्याच्या संबंधित अधिकारापेक्षा अधिक अन्यायकारक, अधिक चुकीचा, अधिक अयोग्य आणि अधिक अनावश्यक असेल तर अशी वसुली अन्यायकारक आणि मनमानी ठरेल. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्याचा अधिकार असंतुलित ठरेल आणि म्हणून नियोक्त्याच्या वसुलीच्या अधिकारावर परिणाम होईल."

१२. अशाप्रकारे जादा रकमेच्या वसुलीवर प्रतिबंधांचा हा दिलासा न्यायालयाकडून कर्मचाऱ्यांना त्यांचा अधिकार म्हणून नव्हे तर समन्यायी दृष्टीने, न्यायिक विवेकबुद्धीचा वापर करून वसुली अमलात आणल्यास, त्यातून होणाऱ्या त्रासातून कर्मचाऱ्यांना मुक्तता मिळावी या दृष्टीने दिला जातो. हे प्रकरण न्यायिक विवेकबुधीच्या कक्षेत असल्याने, न्यायालय कोणत्याही विशिष्ट प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीनुसार जास्त प्रदान केलेल्या रकमेच्या वसुलीसाठी आदेश देऊ शकते.

१३. जगदेव सिंग (उपरोल्लेखित) प्रकरणात कर्मचारी जिवंत होता. त्याला पूर्ण निवृत्तीवेतन मिळत होते आणि त्यांच्या सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत वसुलीची मागणी करण्यात आली होती. या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थितीचा विचारात घेता, मा. न्यायमूर्ती यांनी न्यायिक विवेकबुधीनुसार असा निर्णय दिला आहे की, जेव्हा अधिकाऱ्याने सुधारित मूळ श्रेणीचा विकल्प निवडताना अतिरिक्त प्रदान केलेली

रक्कम परत करण्याचे हमीपत्र दिले आहे, तेव्हा ते हमीपत्रद्वारा बांधील आहेत आणि नियोकत्याने अतिरिक्त प्रदान केलेल्या रकमेची वसुली वैध धरली.

१४. हे प्रकरण असे आहे की, जेथे मृत कर्मचारी सेवेत असताना २०१६ मध्ये मरण पावला. २००२ साली त्यांचे ग्रेड वेतन निश्चित करण्यात आले होते. २००९ मध्ये त्यांनी उत्तरवादी क्र. २ ने ग्रेड वेतन चुकीच्या पद्धतीने निश्चित केल्यामुळे अतिरिक्त रक्कम प्रदान केल्यास ती रक्कम परत करण्याचे आश्वासन दिले होते. आता १६ वर्षानंतर आणि मृत कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर जवळपास पाच वर्षानंतर, उत्तरवादी क्रं. २ यांनी असे प्रकरण सादर केले की, त्यांनी मृत कर्मचाऱ्याचे ग्रेड वेतन चुकीच्या पद्धतीने निश्चित केले आहे आणि याचिकाकर्ती - मृत कर्मचाऱ्यांची विधवा यांना कुटुंब निवृत्तीवेतनातून मृत कर्मचाऱ्याला दिलेली अतिरिक्त रक्कम वसूल करण्यासाठी संमती देण्यास सांगितले.

१५. अभिलेखावरून असे दिसते की, याचिकाकर्ती जी विधवा आहे, ती कमावती नाही आणि ती घरकाम करते. तिचे वय लक्षात घेता हेही उघड आहे की तिची मुलं सुद्धा तिच्यावर अवलंबून आहेत. तिला दरमहा रुपये १४,२५०/- इतके कुटुंब निवृत्तीवेतन मिळत आहे, जे आधीच मूळ निवृत्तीवेतनाच्या ५०% आहे. तर रुपये २,६२,८४१/- इतकी अतिरिक्त प्रदान केलेली रक्कम वसूल करण्याची मागणी करण्यात आली आहे. मयत कर्मचारी, ज्याचे सेवेच्या सुरुवातीच्या काळात निधन झाले आहे आणि ज्याच्यामागे एक विधवा पत्नी आणि मुले आहेत, जेव्हा रक्कम वसूल करण्याची मागणी आली आहे तो १६ वर्षांचा कालावधी, वसुलीच्या रकमेचे आणि कुटुंब निवृत्तीवेतनाच्या रकमेचे प्रमाण, हया बाबी लक्षात घेता

आमचे असे मत आहे की, याचिकाकर्ती जी विधवा आहे आणि पूर्णपणे तिच्या कुटुंब निवृत्तीवेतनावर अवलंबून आहे, तिच्या कुटुंबा निवृत्तीवेतनातून वसुली करणे अन्यायकारक आणि कठोर असेल.जरी मृत कर्मचाऱ्याने त्याच्या वेतनाच्या निश्चितीच्या वेळी हमीपत्र दिले असले तरी, वर नमूद केलेली परिस्थिती लक्षात घेता, याचिकाकर्तीच्या कुटुंब निवृत्तीवेतनातून रुपये २,६२,८४१/- इतक्या अतिरिक्त रक्कमेची वसूली करणे अनुज्ञेय ठरणार नाही.

१६. थोडक्यात, रिट याचिका मंजूर करण्यात येत आहे. दिनांक १८.१.२०२१ आणि दिनांक २२.४.२०२१ ची पत्रे, जी याचिकाकर्तीच्या कुटुंब निवृत्तीवेतनातून १-७-२००२ ते ५-७-२०१६ पर्यंत म्हणजे १४ वर्षाच्या कालावधीतीत कथीत जादा ग्रेड वेतनाची रक्कम रू. २,६२,८४१/- वसूल करण्याचे निर्देश देतात, त्या मर्यादेत रद्द करण्यात येत आहेत.

१७. उपरोक्त अटींच्या सापेक्ष विधी निर्णय मंजूर करण्यात येत आहे. खर्चाबद्दल आदेश नाही.

(न्या. एम. डब्ल्यू. चांदवानी) (न्या. ए एस चांदुरकर)

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x–x–x–x